ePaper
‘आम्हाला पकडून दाखवा, आमच्या अंगावर आलात तर GR जाळत राहू : आदित्य ठाकरे
| वर्ष - 8 | अंक - 326 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- गुकेशच्या शिरपेचात मानाचा तुरा!
- स्टोक्सने पंचांशीही मैदानातच घातला वाद
- डीके शिवकुमार यांना दिलासा!
- सॅनिटरी बॉक्सवर राहुल गांधींचा फोटो

www.mahaenews.com | शनिवार, दि. 5 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## एकनाथ शिंदेंनी दिला ‘जय गुजरात’ चा नारा, भाजपाकडून पाठराखण, उबाठा गटाकडून जोरदार टीकास्त्र

# ‘जय गुजरात’ वरुन घुमशान!

## उबाठा गटाचे उतावीळ प्रवक्ते तोंडावर आपटले, गुजरात वरील टीकेमुळे ‘डबल ढोलकी’ उघडकीस !

| मुंबई / पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुण्यातील एका कार्यक्रमांमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘जय हिंद, जय महाराष्ट्र.. जय गुजरात!’ असा नारा दिल्यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. उद्धव ठाकरे गटाने सुरुवातीला शिंदे यांच्यावर जोरदार टीकास्त्र चढवले. तथापि, नंतर शिंदे यांच्या शिवसेनेकडून, भाजपाकडून आणि उद्धव यांच्या विरोधकांकडून अनेक व्हीडिओ व्हायरल झाले आणि उबाठाचे उतावीळ प्रवक्ते तोंडावर पडले.**



### उद्धव ठाकरे तुम्हीसुद्धा!

शिंदे यांच्या समर्थकांकडून व्हायरल झालेल्या व्हीडिओमध्ये स्वतः उद्धव ठाकरे एका कार्यक्रमात ‘जय गुजरात’ चा नारा देताना दिसत आहेत, तो दुसरे एका कार्यक्रमात आदित्य ठाकरे हे ‘जय उत्तर प्रदेश’ म्हणून घोषणा देत असल्याचे दिसून येते. एकनाथ शिंदे यांचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दात सांगितले, ती कर्नाटक मधील एका कार्यक्रमात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी ‘जय कर्नाटक’ असा नारा दिला होता ‘जय गुजरात’ म्हणण्यात काहीही चूक नाही.

### संजय राऊत, सुषमा अंधारे, आव्हाड..

शिंदे यांच्या तोंडून ‘जय महाराष्ट्र’ हे शब्द उच्चारले गेले आणि संपूर्ण उबाठा सेना त्यांच्यावर तुटून पडली. त्यात प्रामुख्याने उभाठा सेनेचे प्रवक्ते संजय राऊत, सुषमा अंधारे, किशोरी पेडणेकर, अंबादास दानवे तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांचा समावेश होता. त्यांच्यासाठी ही संधीच चालून आली होती. अगदी अमित शहा यांच्यापुढे शिंदे यांचे लोटांगण, येथ पासून ते ‘विनाशकाले विपरीत बुद्धि’ इथपर्यंत सर्व प्रकारच्या टीका केल्या गेल्या. तथापि, ‘जय गुजरात’ म्हटल्याबद्दल तोंडसुख घेणारे शिंदे गटाकडून पुरावे बाहेर काढल्यानंतर तोंडावर आपटले आणि गप्प बसले.

### ‘जय गुजरात का म्हटले?’

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचा व्हीडिओ दाखवत स्पष्टीकरण दिले आहे की पूर्वी उद्धव ठाकरे यांनीही अनेक वेळा ‘जय गुजरात’ ची घोषणा दिली आहे. शिंदेंनी पुण्यातील एका कार्यक्रमात ‘जय गुजरात’ असे म्हटले.

### शिंदे यांचे सडेतोड उत्तर..

यानंतर विरोधकांनी शिंदेंवर जबरदस्त टीका केली. यावर एकनाथ शिंदेंनी सडेतोड उत्तर देत स्पष्टीकरण दिले आहे. शिंदेंनी पुण्यात ‘जयराज स्पोर्ट्स व कन्व्हेन्शन सेंटर’ च्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमात ‘जय गुजरात’ असे म्हटले होते. शिंदे आपल्या भाषणात म्हणाले होते की, ‘या वास्तूचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आणि लोकार्पण गृहमंत्री अमित शहा यांनी केले. मोदींनी हाती घेतलेले काम नेहमीच पूर्णत्वास जाते. अमित शाह हे देशसेवेसाठी समर्पित आहेत राज्याच्या प्रगतीमध्ये तुमचा वाटा आहे. यानंतर भाषण संपवताना एकनाथ शिंदे यांनी ‘जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात’ अशी घोषणा दिली.

### गुजराती बांधवांचा कार्यक्रम

एकनाथ शिंदे म्हणाले की, ‘पुण्यातील गुजराती बांधवांनी एक कॉम्प्लेक्स उभारले आहे. याचे लोकार्पण करण्यात आले. माझ्या भाषणाच्या शेवटी मी जय हिंद, जय महाराष्ट्र असे म्हणतो. जय हिंद म्हणजे देशाच्या अभिमान, जय महाराष्ट्र म्हणजे राज्याचा अभिमान. आज पुण्यातील गुजराती लोकांसाठी कार्यक्रम होता. गुजराती लोकांनी महाराष्ट्राला कर्मभूमी मानली आहे, त्यामुळे मी शेवटी जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात असे म्हणालो.’

### ठाकरे बंधूंच्या मेळाव्यातील हवा काढली !

एकनाथ शिंदे यांनी ‘जय गुजरात’ असे वादग्रस्त व्यक्तव्य करून ठाकरे बंधूंच्या शनिवारच्या मेळाव्यातील हवा काढल्याचे काही राजकीय तज्ज्ञांना वाटत आहे. आता, ठाकरे बंधूंच्या भाषणामध्ये निम्म्यापेक्षा जास्त वेळ हा एकनाथ शिंदे यांच्यावर बोलण्यात किंवा गुजराती भाषेवर टीका करण्यात जाणार आहे. त्यामुळे त्या दोघांच्या भाषणाचा अजेंडा एकनाथ शिंदे यांनी ‘सेट’ केल्याचे बोलले जात आहे. याशिवाय, मराठी प्रेमापोटी इतर भाषांना कमी लेखणाऱ्या ठाकरे बंधूंना ही चपराकच आहे. देशातील सर्व भाषा आपापल्या ठिकाणी श्रेष्ठच आहेत, असे ज्येष्ठ नेते सांगत असून ठाकरे बंधूंच्या मेळाव्यातील हवा, अशा प्रकारे गुगली टाकून एकनाथ शिंदे यांनी काढून घेत त्याचे राजकीय समीक्षकांना वाटते.

### शाहांसमोर शिंदेंचा नारा

यानंतर पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी ‘उद्धव ठाकरेंचा एक जुना व्हीडिओ दाखवला, ज्यात उद्धव ठाकरे हेही जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात असे म्हणत आहेत. तसेच शिंदेंनी आणखी एक पत्र दाखवले, ज्यात ‘मुंबई मा जलेबी आणि फाफडा, उद्धव ठाकरे आपडा !’ असे लिहिलेले आहे. त्याचबरोबर आदित्य ठाकरेंचा एक पोस्टर दाखवत त्यावर ‘केम छो वरली’ असे लिहिलेले आहे, असे ही शिंदेंनी सांगितले.

# महाराष्ट्राच्या प्रगतीत गुजरातचे योगदान!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विरोधकांची टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या श्री पूना गुजराती बंधू समाजच्या 'जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटर'च्या उद्घाटन कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी भाषण संपवताना 'जय हिंद', 'जय महाराष्ट्र' यानंतर 'जय गुजरात' असे म्हटल्याने विरोधकांनी शिंदे यांना लक्ष्य केले.**



मुंबईमध्ये आज (५ जुलै) शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या एकत्रितपणे होणाऱ्या विजयी मेळाव्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या वक्तव्याचे काय पडसाद उमटणार, याकडे आता लक्ष लागले आहे. महाराष्ट्रात तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीची करण्याच्या प्रयत्नांमुळे विरोधकांनी सरकारविरोधात रान उठवले होते. सरकारने याबाबतचा निर्णय मागे घेतल्यानंतर आज, शनिवारी उद्धव आणि राज ठाकरे यांचा विजय मेळावा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पुणे दौऱ्यावर आले होते. त्यांच्या हस्ते एका कार्यक्रमात श्री पुणे गुजराती बंधू समाज यांच्या वतीने उभारण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेंशन सेंटरचे उद्घाटन तसेच पीएचआरसी हेल्थ सिटीचे भूमिपूजन झाले. याच कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषण संपताना 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' असे म्हटल्याने त्यावरून चर्चा सुरू झाली.दरम्यान, शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रात सत्ताधारी असलेले भाजप सरकार आणि शहा यांच्या कामाचे शेरो-शायरी करत कौतुक केले. 'शहा यांच्या कुशल रणनीतीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील भारताची दखल गांभीर्याने घेतली जात आहे. महाराष्ट्राच्या विकासात गुजराती समाजाचे मोठे योगदान असून, महाराष्ट्राच्या संस्कृतीत गुजराती समाज समरस आणि एकरूप होऊन गेला आहे.' असे शिंदे म्हणाले.'गुजराती समाजामुळे महाराष्ट्राची तिजोरी सशक्त होत आहे. गुजराती समाज हा व्यापाराच्या माध्यमातून केवळ पैसा कमवत नाही, तर आपल्या समाजाचे ऋण लक्षात घेऊन सर्व जाती-धर्माच्या लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो. करोनाच्या काळात या समाजाने भरभरून केलेली मदत आणि दान यामुळे या समस्येचा सामना करू शकलो. महाराष्ट्राच्या प्रगतीत गुजराती समाजाने सर्वार्थाने योगदान दिले आहे,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कौतुक केले.मुंबईमध्ये आज (५ जुलै) शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या एकत्रितपणे होणाऱ्या विजयी मेळाव्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या वक्तव्याचे काय पडसाद उमटणार, याकडे आता लक्ष लागले आहे. शनिवारी उद्धव आणि राज ठाकरे यांचा विजय मेळावा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पुणे दौऱ्यावर आले होते.

### 'जय गुजरात'वरून वाद!

पुणे गुजराती बंधू समाज यांच्या वतीने उभारण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेंशन सेंटरचे उद्घाटन तसेच पीएचआरसी हेल्थ सिटीचे भूमिपूजन झाले. याच कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषण संपताना 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' असे म्हटल्याने त्यावरून चर्चा सुरू झाली. दरम्यान, शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रात सत्ताधारी असलेले भाजप सरकार आणि शहा यांच्या कामाचे शेरो-शायरी करत कौतुक केले. 'शहा यांच्या कुशल रणनीतीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील भारताची दखल गांभीर्याने घेतली जात आहे.

# हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो धावली!

## 87 टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाल उर्वरित काम लवकरच पूर्ण होणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माण, हिंजवडी ते शिवाजीनगर यांना जोडणारा एक महत्त्वाचा उपक्रम असलेल्या पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पाचे काम ८७ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम अंतिम टप्यात आहे. त्याअनुषंगाने आज दुपारी मेट्रोची माण डेपो ते पीएमआर ४ स्थानकापर्यंत पहिली चाचणी (ट्रायल) धाव घेण्यात आली.**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), टाटा आणि सीमेन्स समूहाच्या नेतृत्वाखालील पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड यांच्यातील सार्वजनिक – खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलअंतर्गत विकसित केलेला हा प्रकल्प प्रगतीपथावर आहे. संबंधित प्रकल्पाच्या कामास २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरुवात झाली असून या कामाची मुदत मार्च २०२६ पर्यंत आहे.या २३.३ कि.मी लांबीच्या कॉरिडॉरमध्ये २३ स्थानके आणि विद्यमान मेट्रो मार्गासह एकसंध इंटरचेंज असणार आहे. जे पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येसाठी जलद, सुरक्षित वाहतुकीसाठी महत्वाचे ठरणार आहे. चार आधुनिक मेट्रो ट्रेनचा सेट आला आहे.

प्रत्येक ट्रेनमध्ये तीन पूर्णपणे वातानुकूलित डब्बे असून त्याची एकूण प्रवाशी क्षमता अंदाजे एक हजार आहे. या गाड्या ताशी ८० कि.मी वेगाने धावणार आहे. शुक्रवारी मेट्रोची माण डेपो ते पीएमआर ४ स्थानकापर्यंत पहिलीच चाचणी धाव घेण्यात आली. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे पुणे मेट्रो लाईन ३ कार्यान्वित होण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचली आहे.

या मेट्रो लाईन ३ चे काम विक्रमी वेळेत पुर्ण होत असल्याने निश्चितच पुणे शहरासह संबंधित मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.धिकरण (पीएमआरडीए), टाटा आणि सीमेन्स समूहाच्या नेतृत्वाखालील पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड यांच्यातील सार्वजनिक – खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलअंतर्गत विकसित केलेला हा प्रकल्प प्रगतीपथावर आहे. संबंधित प्रकल्पाच्या कामास २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरुवात झाली असून या कामाची मुदत मार्च २०२६ पर्यंत आहे२३ स्थानके आणि विद्यमान मेट्रो मार्गासह एकसंध इंटरचेंज असणार आहे.

जे पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येसाठी जलद, सुरक्षित वाहतुकीसाठी महत्वाचे ठरणार आहे. चार आधुनिक मेट्रो ट्रेनचा सेट आला आहे.

प्रत्येक ट्रेनमध्ये तीन पूर्णपणे वातानुकूलित डब्बे असून त्याची एकूण प्रवाशी क्षमता अंदाजे एक हजार आहे. या गाड्या ताशी ८० कि.मी वेगाने धावणार आहे.डेपो ते पीएमआर ४ स्थानकापर्यंत पहिलीच चाचणी धाव घेण्यात आली. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे पुणे मेट्रो लाईन ३ कार्यान्वित होण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचली आहे.

### चार आधुनिक मेट्रो ट्रेनचा सेट

पुणे शहरासह संबंधित मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल ठरणार आहे.जे पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येसाठी जलद, सुरक्षित वाहतुकीसाठी महत्वाचे ठरणार आहे. चार आधुनिक मेट्रो ट्रेनचा सेट आला आहे. प्रत्येक ट्रेनमध्ये तीन पूर्णपणे वातानुकूलित डब्बे असून त्याची एकूण प्रवाशी क्षमता अंदाजे एक हजार आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताच्या नामानेच वासनाक्षय !

आपण सर्व जीव वासनेत गुंतलेले आहोत, कारण आपला जन्मच वासनेत आहे. वासना म्हणजे, 'आहे ते असू द्याच, आणि आणखीही मिळू द्या' असे वाटणे. आपण सध्या या स्थितीत आहोत. पण सुरुवात म्हणून आपण असे म्हणावे की,'आहे ते असू द्या, आणि आणखी मागायचे ते परमेश्वराजवळ मागू या.' म्हणजे, मिळाले तर 'भगवंताने दिले', आणि न मिळाले तर 'त्याची इच्छा नाही', अशी जाणीव होऊन 'दाता परमात्मा आहे' ही भावना वाढू लागेल; आहे तेही त्याच्याच इच्छेचे फळ आहे असे वाटू लागून अस्वस्थता आणि आसक्ति कमी होऊ लागेल; आणि आसक्ती कमी होऊ लागली की, 'हवे-नको' कमी होऊन वासना ओसरू लागेल. केवळ आपल्या कर्तबगारीने वासनेच्या पलीकडे जाणे अशक्य आहे; त्याला शरणागतीशिवाय गत्यंतर नाही. याकरिता योग्य संगतीचाही फार उपयोग होईल. एखाद्या बैराग्याची संगती केली तर स्वाभाविकच कपड्याचे प्रेम कमी होईल, पण एखाद्या शेटजीच्या संगतीत राहिलो तर छानछोकी करण्याकडे प्रवृत्ती होईल. म्हणून अशा संगतीत राहावे की, ज्यामुळे शरणागती यायला मदत होईल.

शरणागती म्हणजे परमेश्वराला सर्वस्वी अर्पण होऊन राहणे; याचाच अर्थ, आपण उपाधिरहित बनणे. तर मग आपण अशाच साधनाची संगती केली पाहिजे, की जे अत्यंत उपाधिरहित आहे. हे साधन म्हणजे भगवंताचे नाम. काळ, वेळ, परिस्थिती, उच्चनीच भाव, स्त्री-पुरुष, विद्वता-अडाणीपणा, श्रीमंती-गरिबी, प्रकृतीची सुस्थिती-दु:स्थिती वगैरे कोणतीही गोष्ट नामाला आड येऊ शकत नाही. तसेच, त्याला कोणतीही उपकरणे लागत नाहीत. ते हृदयात सतत आपल्याबरोबर बाळगता येते. नामात वैराग्याचे कष्ट नाहीत, आणि कुठेही, केव्हाही ते बरोबर नेता येते. त्यासाठी विषयाची तदाकारवृत्ती सोडली पाहिजे. 'भगवंत माझ्या मागे आहे' अशी श्रद्धा राखली की वृत्ती विषयाशी तदाकार होत नाही. मारुतीने दिलेली मुद्रिका पाहिल्यावर सीतेला रामाच्या स्वरूपाची आठवण झाली, त्याप्रमाणे नाम घेताना आपल्याला त्याची आठवण झाली पाहिजे.

भगवंताच्या अनुसंधानात जो राहिला त्याने काळावर सत्ता गाजविली. अशा लोकांना मरणाचे भय कुठून असणार ? भगवंताला सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरत नाही; आणि जिथे वासना उरली नाही तिथे काळाचा शिरकाव होत नाही. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. वासनेच्या क्षयामध्ये आपलेपणाचे मरण आहे, आणि हे मरण डोळ्यांनी पाहण्यासाठी आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे.

**बोधवचन:- वासनेचा क्षय भगवंताच नामात आहे हे अक्षरशः खरे आहे.**

# मराठी - हिंदी सक्तीच्या वादात विजयी कोण, पराभूत कोण ?



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**ठाकरे बंधूंचा शनिवारी मराठी भाषेच्या विजया बद्दल विजयोत्सव होणार आहे. यात जो कथित विजय झाला आहे, त्याचे श्रेय कोणीही घ्यायचे नाही असे मनसे आणि उबाठा सेनेनी ठरवले आहे. आता, कोणी श्रेय घेणार नाही, कोणाचा झेंडा नसणार, हे पण मनसे, उबाठा सेना ठरवणार. सभा कुठे होणार, कोण त्याची व्यवस्था पहाणार, व्यासपीठावर कोण असणार, कितीजण असणार, कोणत्या क्रमाने बोलणार, निमंत्रण कोण, कसे देणार हे मनसे, उबाठा सेना ठरवणार नव्हे ठरवले आहे. मात्र झेंडा कोणाचा असणार नाही असे जाहीर केले आहे.**

### मेळावा भाषेसाठी का मनो मीलनासाठी?

हे सर्व वातावरण अनुभवले की वाटते, मराठी भाषेसाठी हा मेळावा आहे की दोन भावांच्या मनोमीलनासाठी? बरे हे मनोमीलन कौटुंबिक आहे की राजकीय ? मुंबई महापालिकेची सत्ता हे ध्येय आहे की मराठी माणूस, मराठी भाषा? हे आहे. जनतेला संभ्रमात टाकणे हा सगळ्याच राजकारणी मंडळींचा हल्ली आवडीचा छंद झाला आहे. मूळ विषय बाजूला कसा राहील आणि आपल्याला पाहिजे तो विषय पुढे कसा येईल, हे पहिले जाते, हे निश्चित.

### मग हा तर महाजुमला..

मराठी विषयावरून दोघे भाऊ एकत्र येणे, हा विषय आता त्यांच्या समोर आहे. ते एकत्र का यावेत तर महापालिकेसाठी. बरं ते बाजूला का गेले होते, तर बडव्यांनामुळे. आत ते बडवे राज ठाकरे यांना दिसत नाहीत का? देश जर जुमलेबाजीवर चालत आहे, असे विरोधक म्हणत असतील तर मराठी भाषा प्रेमाच्या मुखवट्याखाली आणि दोन बिछडलेले बंधू एकत्र आणणे हा महाजुमला आहे हे मान्य केले पाहिजे, खरे आहे ना!

### केवळ सत्ता आणि पैशाची भाषा..

आपल्या मुलांना शाळेत घालताना भाषा प्रेम नव्हते, मात्र, आता ते निर्माण झाले. नातवंडे शाळेत जातील, तेव्हा ते कमी झालेले असेल. मराठी भाषा महानगरातल्या या नेते, राजकारणी मंडळींमुळे टिकली नाही. टिकणार नाही. या मंडळींना मराठी भाषेबद्दल फार प्रेम आहे, असे अजिबात नाही. त्यांना केवळ सत्ता आणि पैशाची भाषा कळते हे केवळ सत्य आहे. मराठी भाषा ग्रामीण भागातील मंडळींमुळे टिकली आहे. टिकणार आहे.

### मुद्दा त्रिभाषा सक्तीचा..

या राजकारणी मंडळींनी मेहरबानी करून ग्रामीण भागात इंग्रजीचे विरजण लावू नये. वारकरी मंडळी आणि संत साहित्यावर प्रेम करणारी मंडळी यांच्यात आपल्या सत्ताकांक्षेचे विष पेरू नये. संतांना जातीच्या चौकटीत विभागले आहेच, आता मराठी भाषा उरली आहे ती तरी आहे तशीच ठेवावी. मुद्दा आहे त्रिभाषा सक्तीचा. बालमानसोपचारतज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा विचार, मत लक्षात घेऊन शैक्षणिक धोरण अजून तरी ठरवावे. स्तनपान सप्ताह ते जनावरांना होणाऱ्या लाळखुरकत रोगापर्यंत आणि अवकाशयान ते एक शिक्षकी शाळे पर्यंत सगळे आपल्याच कळते आणि त्याची जबाबदारी आपलीच आहे, या गोड गैरसमजात नेते, राजकारणी मंडळी आणि त्यांच्या सुत्रानी राहू नये.

### संजय राऊत यांचे कर्तृत्व काय?

उबाठा गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांना जे नाशिक सांभाळायला जबाबदारीने पाठवले त्या नाशिकमध्ये कोणी विचारत नाही. याचा विचार करून बोलले पाहिजे. मात्र, दररोज बोलले नाहीतर जनता आपल्याला विसरून जाईल असा समज, भीती त्यांना असावी. तसेही त्यांना लक्षात ठेवावे, असे त्यांचे काय कर्तृत्व आहे, हे त्यांनी सांगितले पाहिजे. ज्यांना ते गद्दार म्हणतात त्यांच्या मतावर राज्यसभेत ते निवडून आले आहेत, ते गद्दार मग त्यांच्या मतावर निवडून आले, हे कोण असा प्रश्न राहतोच. तेव्हा विषय महानगरपालिका निवडणुकीचा आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी तुलनेने अलिप्त आहेत हे पण विचारात घेतले पाहिजे.

### डॉ. जाधव समितीचा अहवाल महत्त्वाचा..

डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती अहवाल देईल त्या नंतर त्रिभाषा सक्तीचा निर्णय सरकार घेणार आहे. त्यामुळे कथित मोर्चात आणि आंदोलनात जय कोणाचा आणि पराभूत कोण, याचा पत्ता लागलेला नाही, हे वास्तव आहे.

### विजयाच्या धुंदीत मश्गुल..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केलेले दोन्ही जीआर हे आपल्याच रेट्यामुळे अशा धुंदीत मनसे आणि उबाठा सेना सध्या वल्गना करत आहे. विजयाच्या धुंदीत त्यांना काही दिवस राहू दे, महानगरपालिका ही आपलीच आहे अशा थाटात 'महायुती' आहे, त्यामुळे विजय नक्की कोणाचा आहे समजत नाही. मुंबई महानगरपालिका निवडणुकीमध्ये या प्रश्नाचा गौप्यस्फोट होईल हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बाजीराव विहिरीजवळ रंगला रिंगण सोहळा!

## माउलींचे गोल, तर तुकोबारायांचे उभे रिंगण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माउलींच्या पालखी सोहळ्यातील चौथे आणि शेवटचे गोल रिंगण आणि उभे रिंगण बाजीराव विहिरीजवळ उत्साहात पार पडले. तर, दुसरीकडे तुकोबारायांच्या पालखीचे बाजीराव विहिरीजवळ उभे रिंगण रंगले. पालखी सोहला आता पंढरीच्या समीप येऊन पोहोचला असून शनिवारी सर्व संतांच्या पालख्या पंढरीत दाखल होणार आहेत. पंढरी नगरी वैष्णवांच्या मांदियाळीत अर्थात भाविकांच्या भक्तिसागरात न्हाऊन निघणार आहे.**



माउलींची पालखी भंडीशेगावमधील मुक्काम आटोपून आज पुढे मार्गस्थ झाली. वाखरीजवळील बाजीराव विहिरीजवळ शेवटच्या गोल रिंगणाचा सोहळा रंगला. या ठिकाणी पालखी सोहळ्यासाठी हजारो भाविक दुपारपासून दाखल झाले. मोठ्या लवाजम्यासह माउलींची पालखी रिंगणाच्या ठिकाणी पोहोचली. त्यानंतर मोठ्या दिमाखात माउलींचे अश्व रिंगणाच्या ठिकाणी आले. चोपदाराने इशारा करताच माउलींच्या अश्वाने दौड करत रिंगण पूर्ण केले. गोल रिंगणानंतर त्याच ठिकाणी रस्त्यावर उभे रिंगण झाले. या वेळी दुतर्फा जमलेले भाविक आणि त्या मधोमध अश्वाची दौड; या क्षणाचे हजारो भाविक साक्षीदार झाले. यानंतर माउलींची पालखी वाखरी येथे विसावली.दुसरीकडे माउलींच्या पालखीचा रिंगण सोहळा पार पडल्यानंतर बाजीराव विहीर येथे संत तुकाराम महाराजाच्या पालखी सोहळ्यातील उभे रिंगण रंगले. पंढरपूरपासून मोजक्याच अंतरावर असणाऱ्या तुकोबांच्या या रिंगण सोहळ्यास वारकऱ्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. आधी पताकाधारी, त्यानंतर डोक्यावर तुळस घेतलेल्या महिला वारकरी, पखवाजवादक आणि वीणाधारी यांनी रिंगणात फेरी पूर्ण केली. त्यानंतर चोपदाराचा अश्व आणि तुकोबांचा अश्व यांनी रिंगण वेगात पूर्ण केलं. यानंतर तुकोबारायांची पालखी वाखरी मुक्कामी पोहचली. शनिवारी वाखरी येथे उभे रिंगण होणार आहे. त्यानंतर संत नामदेव महाराज हे परंपरेने वाखरी येथील सर्व संतांना पंढरीचे निमंत्रण देतात असे वारकरी संप्रदायात मानले जाते. या वेळी वाखरीत संत मुक्ताई, संत एकनाथ महाराज यांचे पालखी सोहळेही यात सामील होतात. त्यानंतर सर्व संत पंढरीकडे मार्गस्थ होतील.

ज्या दिवसाची वाट पाहत पायी निघालेल्या भाविसांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे बाजीराव विहीर इथे माउलीच्या रिंगण सोहळ्यास उपस्थित राहिले. रिंगण सोहळा झाल्यावर येथील वारकऱ्यांसोबत फुगडी खेळण्याचा मोह त्याना आवरता आला नाही. या नंतर माउलीची पालखी वाखरी इथे मुक्कमी मार्गस्थ झाली. या वेळी शेलार यांनी पायी चालत वारकऱ्यांसोबत टाळ ,भजन, करत सामील झाले. त्याचबरोबर मंत्री नितेश राणे यांनी देखील माउलीच्या पालखीचे दर्शन घेतले आणि पायी वारी केली.क आज पंढरीत येणार आहेत. 'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा' या अभंगाप्रमाणे पंढरी भक्तिसागरात न्हाऊन निघणार आहे.

### शनिवारी सर्व पालख्या पंढरीत

माउलींची पालखी भंडीशेगावमधील मुक्काम आटोपून आज पुढे मार्गस्थ झाली. वाखरीजवळील बाजीराव विहिरीजवळ शेवटच्या गोल रिंगणाचा सोहळा रंगला. या ठिकाणी पालखी सोहळ्यासाठी हजारो भाविक दुपारपासून दाखल झाले. मोठ्या लवाजम्यासह माउलींची पालखी रिंगणाच्या ठिकाणी पोहोचली. त्यानंतर मोठ्या दिमाखात माउलींचे अश्व रिंगणाच्या ठिकाणी आले. चोपदाराने इशारा करताच माउलींच्या अश्वाने दौड करत रिंगण पूर्ण केले.गोल रिंगणानंतर त्याच ठिकाणी रस्त्यावर उभे रिंगण झाले. या वेळी दुतर्फा जमलेले भाविक आणि त्या मधोमध अश्वाची दौड; या क्षणाचे हजारो भाविक साक्षीदार झाले. यानंतर माउलींची पालखी वाखरी येथे विसावली.दुसरीकडे माउलींच्या पालखीचा रिंगण सोहळा पार पडल्यानंतर बाजीराव विहीर येथे संत तुकाराम महाराजाच्या पालखी सोहळ्यातील उभे रिंगण रंगले.

# लुटणाऱ्या गोरक्षकांना पायबंद घाला

## काँग्रेसच्या नाना पटोले यांची विधानसभेत मागणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात गोवंश हत्याबंदीचा कायदा आहे. मात्र, या कायद्याच्या आडून तथाकथित गोरक्ष शेतकऱ्यांना लुटत आहेत. शेतकऱ्यांना बैल बाजारात विकणे मुश्कील झाले असून या गोरक्षकांना पायबंद घाला, अशी मागणी काँग्रेसचे नाना पटोले यांनी विधानसभेत केली.**



गोंदिया जिल्ह्यात शेतकरी शेतीसाठी बैल घेऊन जात असताना पोलिसांनी पकडले. बैल जप्त केले आणि गोरक्षकांच्या स्वाधीन करून त्यांच्या संस्थेत पाठवले. मी जिल्हाधिकाऱ्यास फोन केला असता, त्यांनी ठाणेदाराला बैल सोडण्यास सांगितले. परंतु, या गोरक्षकांनी बैल देण्यास नकार दिला. त्यांनी ते परस्पर विकून टाकले. हे तथाकथित गोरक्षक शेतकऱ्यांना लुटत आहेत. यावर सरकारने उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी मागणी पटोले यांनी केली. शेतकऱ्यांवर अन्याय झाला, तिथे मी खासदारकी सोडली. सत्तेतील लोक जर शेतकऱ्यांचा छळत असतील तर कदापि सहन केले जाणार नाही. काल शेतीप्रश्नावरील चर्चेदरम्यान सभागृहात मंत्री नव्हते. शेतकऱ्यांविषयी या सरकारची काय मानसिकता आहे, हे जनतेने पाहिले आहे. ज्या महाराष्ट्राने देशाला दिशा देण्याचे काम केले, त्या राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या भूषणावह नाहीत. शेतीची परिस्थिती बिघडवण्याचे काम केंद्र व राज्यातील भाजप सरकारांनी केले असून शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी सरसकट शेतकरी कर्जमाफी करावी, अशी मागणी पटोले यांनी केली.गोंदिया जिल्ह्यात शेतकरी शेतीसाठी बैल घेऊन जात असताना पोलिसांनी पकडले. बैल जप्त केले आणि गोरक्षकांच्या स्वाधीन करून त्यांच्या संस्थेत पाठवले. मी जिल्हाधिकाऱ्यास फोन केला असता, त्यांनी ठाणेदाराला बैल सोडण्यास सांगितले. परंतु, या गोरक्षकांनी बैल देण्यास नकार दिला. त्यांनी ते परस्पर विकून टाकले.

### सरकारची काय मानसिकता

हे तथाकथित गोरक्षक शेतकऱ्यांना लुटत आहेत. यावर सरकारने उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी मागणी पटोले यांनी केली. शेतकऱ्यांवर अन्याय झाला, तिथे मी खासदारकी सोडली. सत्तेतील लोक जर शेतकऱ्यांचा छळत असतील तर कदापि सहन केले जाणार नाही. काल शेतीप्रश्नावरील चर्चेदरम्यान सभागृहात मंत्री नव्हते. शेतकऱ्यांविषयी या सरकारची काय मानसिकता आहे, हे जनतेने पाहिले आहे. ज्या महाराष्ट्राने देशाला दिशा देण्याचे काम केले, त्या राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या भूषणावह नाहीत. शेतीची परिस्थिती बिघडवण्याचे काम केंद्र व राज्यातील भाजप सरकारांनी केले असून शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी सरसकट शेतकरी कर्जमाफी करावी, अशी मागणी पटोले यांनी केली.गोंदिया जिल्ह्यात शेतकरी शेतीसाठी बैल घेऊन जात असताना पोलिसांनी पकडले. बैल जप्त केले आणि गोरक्षकांच्या स्वाधीन करून त्यांच्या संस्थेत पाठवले.

# डीके शिवकुमार यांना दिलासा!

## जाहिरात प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यावरील मानहानीच्या खटल्याच्या प्रकरणावर कर्नाटक उच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय दिला आहे. डीके शिवकुमार यांच्या विरुद्धच्या फौजदारी मानहानी खटल्याच्या न्यायालयीन कार्यवाहीला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे डीके शिवकुमार यांना मोठा दिलासा मिळाला आहे.**





कर्नाटक विधानसभा निवडणूक २०२३ च्या आधी काँग्रेस पक्षाने प्रसिद्ध केलेल्या 'करप्शन रेट कार्ड' अशा आशयाच्या जाहिरातींवरून डीके शिवकुमार यांच्यासह काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्यावर भारतीय जनता पक्षाने हा खटला दाखल केला होता. या खटल्याच्या माध्यमातून भाजपाने आरोप केला होता की, '२०१९ ते २०२३ दरम्यान भाजपाच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या कार्यकाळाबाबत अपमानास्पद आरोपांसह वृत्तपत्रात जाहिराती प्रकाशित करण्यात आल्या होत्या, त्यासाठी डीके शिवकुमार हे जबाबदार आहेत', असा आरोप केला होता. या जाहिरातींमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारचा उल्लेख ४० टक्के कमिशन सरकार असा करण्यात आला होता. तसेच त्यामध्ये आरोप करण्यात आला होता की सरकारने कंत्राटी कामं देणे, कोविडशी संबंधित कामांमध्ये कमिशन घेतलं आहे. तसेच अशा प्रकारची टिप्पणी राहुल गांधी यांनीही सार्वजनिक भाषणात केल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भातील वृत्त बार अँड बेंचने दिलं आहे.दरम्यान, या सर्व प्रकरणावर प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती एसआर कृष्ण कुमार यांनी आज केपीसीसी आणि शिवकुमार यांच्याविरुद्धच्या फौजदारी कारवाईला पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली. मानहानीचा खटला दाखल करण्यासाठी वापरल्या गेलेल्या जाहिरातींमध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारने त्यांच्या कार्यकाळात कमिशन घेण्यासारख्या भ्रष्ट पद्धतींद्वारे कर्नाटकातील लोकांकडून १,५०० कोटी रुपये लुटल्याचा आरोप होता. तसेच सरकारी पदे मिळवण्यासाठी दिल्या जाणाऱ्या लाचेचा आरोप करत स्कोअर कार्ड आणि रेट कार्ड असलेली प्रणाली लागू केल्याचा आरोपही संबंधित जाहिरातींमध्ये करण्यात आला होता. यावरून भाजपाने मे २०२३ मध्ये काँग्रेस पक्ष आणि डीके शिवकुमार यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. तसेच २०२४ मध्ये एका कनिष्ठ न्यायालयाने मानहानीचा खटला दाखल करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणात आरोपींना जामीन मिळाला होता. भाजपाची तक्रार केवळ त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आली होती.कर्नाटक विधानसभा निवडणूक २०२३ च्या आधी काँग्रेस पक्षाने प्रसिद्ध केलेल्या 'करप्शन रेट कार्ड' अशा आशयाच्या जाहिरातींवरून डीके शिवकुमार यांच्यासह काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्यावर भारतीय जनता पक्षाने हा खटला दाखल केला होता.

### मानहानी खटला कार्यवाहीला स्थगिती

या खटल्याच्या माध्यमातून भाजपाने आरोप केला होता की, '२०१९ ते २०२३ दरम्यान भाजपाच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या कार्यकाळाबाबत अपमानास्पद आरोपांसह वृत्तपत्रात जाहिराती प्रकाशित करण्यात आल्या होत्या, त्यासाठी डीके शिवकुमार हे जबाबदार आहेत', असा आरोप केला होता.या जाहिरातींमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारचा उल्लेख ४० टक्के कमिशन सरकार असा करण्यात आला होता. तसेच त्यामध्ये आरोप करण्यात आला होता की सरकारने कंत्राटी कामं देणे, कोविडशी संबंधित कामांमध्ये कमिशन घेतलं आहे. तसेच अशा प्रकारची टिप्पणी राहुल गांधी यांनीही सार्वजनिक भाषणात केल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भातील वृत्त बार अँड बेंचने दिलं आहे.

# सॅनिटरी पॅडच्या बॉक्सवर राहुल गांधींचा फोटो

## राहुल गांधींचा फोटो देण्यात आल्यामुळे बिहारमध्ये प्रचंड वाद

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. रॅली, सभा, मेळाव्यांसह नेते पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेत निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या कामाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहेत. तसेच विविध राजकीय पक्षांकडून निवडणुकीसाठी रणनीती आखत विविध उपक्रम राबवले जात आहेत. काँग्रेसनेही बिहार निवडणुकीसाठी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.**



विधानसभेच्या निवडणुकीत महिला मतदारांना आकर्षित करण्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने काही उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसच्या एका उपक्रमावरून बिहारच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटलं आहे. काँग्रेसने सॅनिटरी नॅपकिन्स वाटण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. मात्र, त्या सॅनिटरी नॅपकिन्सच्या पाकिटावर काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा फोटो देण्यात आल्यामुळे प्रचंड वाद सुरू झाला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.काँग्रेसने संपूर्ण बिहारमध्ये पाच लाख सॅनिटरी पॅड वाटण्याची मोहीम हाती घेतली आहे. तसेच वाटण्यात येणाऱ्या सॅनिटरी पॅडवरील बॉक्सवर राहुल गांधींचा फोटोही लावण्यात आलेला आहे.

तसेच त्या फोटोवर 'मै बहन मान योजना' असं देखील लिहिलेलं आहे. काँग्रेसने 'पॅडमॅन' स्टाईल हा उपक्रम सुरू केल्यामुळे आणि सॅनिटरी पॅडवरील बॉक्सवर राहुल गांधींचा फोटो लावण्यात आल्यामुळे भारतीय जनता पक्षाने काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे.दरम्यान, काँग्रेसला विश्वास आहे की महिलांमध्ये सॅनिटरी पॅड वाटल्याने पक्षाची प्रतिमा सुधारेल आणि त्यांना त्यांची मतेही मिळू शकतील. काँग्रेसच्या महिला केंद्रित व्यापक प्रचाराचा एक भाग असल्याचंही बोलले जात आहे.

### राजदला निवडणुकीत धडा शिकवतील

याशिवाय दरमहा २५०० रुपये देण्यात येणार असल्याचंही काँग्रेसकडूनही आश्वासन देण्यात येत आहे. या बरोबरच अशा विविध योजनांवर विचारमंथन करण्यासाठी आज (४ जुलै) बिहार काँग्रेसची एक महत्त्वाची बैठक देखील बोलावण्यात आली होती. त्या बैठकीत काँग्रेसचे अनेक पदाधिकारी देखील उपस्थित होते. राहुल गांधींचा फोटो सॅनिटरी पॅडच्या बॉक्सवर लावण्यामुळे भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी जोरदार टीका केली आहे. एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत म्हटलं की, "सॅनिटरी पॅडवर राहुल गांधींचा फोटो लावत काँग्रेस बिहारमधील महिलांचा अपमान करत आहे. काँग्रेस हा महिलाविरोधी पक्ष आहे, बिहारमधील महिला काँग्रेस आणि राजदला निवडणुकीत धडा शिकवतील", असं प्रदीप भंडारी यांनी म्हटलं आहे.

# दोन्ही राजकीय बाजू फायद्यासाठी



कलर्स मराठी वाहिनीवरील 'राजा राणीची गं जोडी' ही मालिका प्रचंड गाजली होती. या मालिकेतील शिवानी सोनार आणि मनिराज पवार यांच्या भूमिका चांगल्याच गाजल्या होत्या. या दोघांशिवाय मालिकेत पार्थ घाटगेही मुख्य भूमिकेत होता. मालिकेतील त्याची भूमिका प्रेक्षकांनी चांगलीच आवडली होती. यानंतर अभिनेता अनेक मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आला. अभिनयाबरोबरच पार्थ सोशल मीडियावरही बराच सक्रीय असतो. सोशल मीडियावर पार्थ अनेक मजेशीर व्हिडीओ शेअर करत असतो. तसंच त्याच्या काही पोस्ट लक्षवेधी असतात. अशातच पार्थने पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमधून पार्थने तुकाराम महाराजांच्या अभंगाचा संदर्भ देत आजूबाजूच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीबद्दल मत व्यक्त केलं आहे. तसंच जातीय राजकरणावरही पार्थने प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काय आहे ही पोस्ट? चला जाणून घेऊ...या पोस्टमध्ये पार्थ असं म्हणतो, "ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र । चांडाळा आहे अधिकार ।। बालें नारी नर । आदी करोनी वेश्याही ।।' असं बोलुन तुकोबा रायांनी वर्षांवर्षे परमात्मा आणि ज्ञानप्राप्ती आणि बहुजनांमध्ये असणाऱ्या कर्मठतने बांधलेल्या अन्यायाची भिंत मोडुन काढली. त्यांचा बंड मोडुन काढायचे असंख्य प्रयत्न झाले, प्रतिगामी आणि कर्मठ विचारांच्या लोकांच्या मुसक्या आवळुन तुकोबांची लेखणी सगळ्यांना पुरुन उरली.

# छोट्या पडद्यावरची आणखी एक मालिका बंद होणार!

छोट्या पडद्यावर येत्या काही महिन्यांत अनेक नवनवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्यामुळे प्रत्येक वाहिनीवर सध्या टीआरपी मिळवण्यासाठी जोरदार तयारी सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. ज्यावेळी नवीन मालिका सुरू होतात, त्यावेळी संबंधित वाहिनीवरच्या जुन्या मालिकांना प्रेक्षकांचा निरोप घ्यावा लागतो. नुकताच एका लोकप्रिय मालिकेच्या सेटवर शूटिंगचा शेवटचा दिवस पार पडला. 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिकेचा शेवटचा भाग ५ जुलैला प्रसारित होणार आहे. 'प्रेमाची गोष्ट' ही मालिका निरोप घेणार असल्याची माहिती प्रत्येकाला आहे. मात्र, याचबरोबर छोट्या पडद्यावरची आणखी मालिका ऑफ एअर होणार आहे. ही मालिका कोणती जाणून घेऊयात...'तुझी माझी जमली जोडी' ही मालिका 'सन मराठी' वाहिनीवर प्रसारित केली जायची. या मालिकेत 'देवमाणूस' फेम लोकप्रिय अभिनेत्री अस्मिता देशमुख प्रमुख भूमिका साकारत होती आणि तिच्यासह लोकप्रिय अभिनेता संचित चौधरी प्रमुख भूमिकेत झळकत होता.संचितने यापूर्वी 'तुझ्या इश्काचा नादखुळा', 'असे हे सुंदर आमचे घर' अशा मालिकांमध्ये देखील काम केलेलं आहे. अस्मिता व संचित या दोघांचाही चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. या दोघांनी सेटवरच्या शेवटच्या दिवसाची झलक इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केली आहे. संचितने "समाप्त..." असं लिहिलेला स्क्रिप्टचा फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये "आणि हा प्रवास संपला" असं म्हटलं आहे. याशिवाय अस्मिताने शेअर केलेल्या पोस्टमध्ये शूटिंगच्या शेवटच्या दिवसाची झलक पाहायला मिळत आहे. "IT'S A WRAP... हा प्रवास खूप सुंदर होता" असं कॅप्शन देत मालिकेच्या टीमने सर्वांचा निरोप घेतला आहे. शेवटच्या दिवशी सगळेच कलाकार भावुक झाले होते. ही मालिका डिसेंबर २०२३ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आली होती आणि आता दीड वर्षांनी लवकरच ऑफ एअर होईल.



# माझ्या मनातलं सगळंच

मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडितने आजवर अनेक भूमिका साकारल्या आहेत. एक अभिनेत्री असण्याबरोबरच ती निर्मातीदेखील आहे. तेजस्विनीने आपल्या अभिनयाच्या जोरावर मनोरंजनसृष्टीत नाव कमावलं आहे. स्वामी समर्थांची प्रचिती, अनुभव अनेकांना येत असतो. श्री स्वामी समर्थांची सेवा मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकार मोठ्या भक्तिभावानं करतात. लोकप्रिय अभिनेत्री तेजस्विनी पंडितदेखील स्वामींची भक्त आहे. अभिनेत्रीने तिच्या इन्स्टाग्रामवर श्री स्वामी समर्थांचा फोटो शेअर करत श्रद्धा व्यक्त केली. तेजस्विनीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्रीने विठ्ठलाच्या रुपात सजलेल्या स्वामी समर्थांचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. फोटो शेअर करत तिने कॅप्शन दिलं आहे, "माझ्या मनातलं सगळंच तुम्हाला माहीत आहे, फक्त पाठीशी रहा आणि बळ द्या स्वामी माऊली. आषाढी एकादशी अगदी नजीक येऊन ठेपली असताना हे चित्र नजरेस पडणं म्हणजे किती सुरेख योगायोग." तेजस्विनी पंडितने शेअर केलेल्या पोस्टवर अनेकांनी 'श्री स्वामी समर्थ' अशा कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री तेजस्विनी पंडितचा लवकरच 'येरे येरे पैसा ३' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले आहे. हा चित्रपट १८ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'येरे येरे पैसा ३' या चित्रपटात तेजस्विनीसह सिद्धार्थ जाधव, संजय नार्वेकर, उमेश कामत, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही चर्चित चेहरे दिसणार आहेत.

# हार्दिकने अनुभवली पंढरपूरची वारी

'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेतून प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचलेला सर्वांचा लाडका राणादा म्हणजेच अभिनेता हार्दिक जोशी. हार्दिक जोशीने या मालिकेत साकारलेल्या भूमिकेला प्रेक्षकांची खूप पसंती मिळाली. ही मालिका संपून चार वर्षे झाली; तरीही त्याची भूमिका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. आजही हार्दिकला अनेक चाहते राणादा या भूमिकेमुळे ओळखतात. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणारा हार्दिक सोशल मीडियावरही तितकाच सक्रीय असतो. हार्दिक सोशल मीडियावर त्याचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असतो. अशातच त्याने नुकताच शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेताना दिसत आहे; हा व्हिडीओ आहे आषाढी वारीचा. आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने जात आहे. लाखों वारकरी पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होत त्याचं दर्शन घेण्यासाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत.

# प्रसिद्ध निर्माते एकता कपूरवर संतापले



भारतीय टेलिव्हिजनची 'क्वीन' एकता कपूरने २५ वर्षांपूर्वी तिच्या पहिल्या के-शो मालिका सुरू केल्या. निर्माती-दिग्दर्शिका तिच्या 'क्योंकि सास भी कभी बहू थी' आणि 'कहानी घर घर की' या शोसाठी प्रसिद्ध झाली. 'क्योंकि सास भी कभी बहू थी' प्रेक्षकांमध्ये, विशेषतः महिला प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या शोची खूप चर्चा झाली आहे. ही एक हिंदी मालिका आहे, जी स्टार प्लसवर ३ जुलै २००० ते ६ नोव्हेंबर २००८ या कालावधीत प्रसारित झाली होती. शोभा कपूर आणि एकता कपूर यांनी त्यांच्या बालाजी टेलिफिल्म्स बॅनरखाली या शोची निर्मिती केली होती.एकताने सासू-सुनेचे असे शो आणले आहेत जे काही लोकांना खूप आवडले, तर काहींना हे शो आवडले नाहीत. एकता कपूरवर भारतीय संस्कृतीला बरबाद केल्याचा आरोप केला आहे.'लर्न फ्रॉम द लेजेंड' या यूट्यूब चॅनेलवरील अलीकडेच झालेल्या संवादात पहलाज निहलानी यांनी एकतावर तिच्या शोमध्ये दोन बायकांची संकल्पना दाखवल्याबद्दल आरोप केले. पण, त्यांनी असेही म्हटले की तिच्या शोमध्ये महिलांना अनेक वेळा लग्न करताना दाखवले जाते.



# गुकेशच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## ‘कमजोर खेळाडू’ म्हटल्या गेलेल्या ‘रॅपिड’ प्रकारात विजेता

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बुद्धिबळच्या रॅपिड आणि ब्लिट्सझ या प्रकारातील कमजोर खेळाडू म्हणून हिणवल्या गेलेल्या भारताच्या डी गुकेशने या स्पर्धेतील रॅपिड प्रकाराचे जेतेपद पटकावले आहे. सध्याचा वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या डी गुकेशने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर आपलं वर्चस्व गाजवलं आहे. शुक्रवारी क्रोएशियातील झाग्रेब येथे झालेल्या ग्रँड चेस टूर २०२५ रॅपिड अँड ब्लिट्झमध्ये रॅपिड जेतेपद गुकेशने आपल्या नावे केलं आहे.**



गुकेशला मॅग्नस कार्लसनने या स्पर्धेतील कमजोर खेळाडू असं हिणवलं होतं, पण आता या स्पर्धेतील रॅपिड प्रकारात अव्वल क्रमांक मिळवला आहे. मॅग्नस कार्लसनला या स्पर्धेतील चौथ्या फेरीत पराभूत करून त्याच्या वाक्याचं गुकेशने चोख प्रत्युत्तर दिलं होतं.१९ वर्षीय गुकेशने उत्कृष्ट कामगिरी आणि जबरदस्त फॉर्म दाखवत १८ पैकी १४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. त्याने अंतिम फेरीतही उत्कृष्ट कामगिरी केली आणि विजयी ठरला. गुकेशच्या या स्पर्धेतील मोहिमेची सुरूवात पराभवाने झाली. पहिल्या फेरीत त्याला जॅन क्रिज्स्टोफ दुडाकडून पराभव पत्करावा लागला. पण या पराभवामुळेच गुकेशने अजून जोमानं मेहनत करत पुढच्या सामन्यांमध्ये विजय मिळवला.पहिल्या पराभवानंतर गुकेशन सलग पाच विजयांची आश्चर्यकारक मालिका कायम ठेवली. ज्यामध्ये चौथ्या फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसनला त्याने पुन्हा एकदा पराभवाचा दणका दिला.

यामुळे तो आघाडीवर पोहोचला आणि स्पर्धेत त्याची पकड मजबूत झाली.सातव्या आणि आठव्या फेरीत अनिश गिरी आणि क्रोएशियाच्या इव्हान एरिक विरुद्ध बरोबरी साधल्यानंतर, गुकेशने अंतिम फेरीत रॅपिड सेक्शनमध्ये वेस्ली सो वर महत्त्वपूर्ण विजय मिळवला. गुकेशची अचूकता, संयम यामुळे तो स्पर्धेतील एक मोठा कट्टर प्रतिस्पर्धी ठरला.विश्वविजेत्याने गुकेशने चमकदार कामगिरी केली, तर भारतीय संघाचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद थोडा मागे राहिला. एका विजयासह, सात ड्रॉसह आणि एका पराभवासह, प्रज्ञानंद ९ गुणांसह चौथ्या स्थानी राहिला. प्रज्ञानंद एकूण क्रमवारीत अजूनही शर्यतीत आहे, त्याने मे महिन्यात बुखारेस्टचा टप्पा जिंकला होता आणि वॉर्सामध्ये तिसरे स्थान मिळवले होते. २०२५ च्या ग्रँड चेस टूरमधील तिसरा टप्पा हा ब्लिट्झ विभागातील सुपरयुनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ शनिवारी सुरू होईल आणि ६ जुलै रोजी संपेल. रॅपिड आणि ब्लिट्झ दोन्ही फॉरमॅटमधील एकत्रित गुण स्पर्धेचा एकूण विजेता निश्चित करतील. अमेरिकेत (ऑगस्टमध्ये) उर्वरित भाग आणि ब्राझीलमध्ये (सप्टेंबर-ऑक्टोबर) अंतिम फेरीसाठी झाग्रेबमधील गुकेशचा दमदार फॉर्म हा भारतीय बुद्धिबळसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.गुकेशला मॅग्नस कार्लसनने या स्पर्धेतील कमजोर खेळाडू असं हिणवलं होतं, पण आता या स्पर्धेतील रॅपिड प्रकारात अव्वल क्रमांक मिळवला आहे. मॅग्नस कार्लसनला या स्पर्धेतील चौथ्या फेरीत पराभूत करून त्याच्या वाक्याचं गुकेशने चोख प्रत्युत्तर दिलं होतं.

### गुकेशचा दमदार फॉर्म

१९ वर्षीय गुकेशने उत्कृष्ट कामगिरी आणि जबरदस्त फॉर्म दाखवत १८ पैकी १४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले.गुकेशच्या या स्पर्धेतील मोहिमेची सुरूवात पराभवाने झाली. पहिल्या फेरीत त्याला जॅन क्रिज्स्टोफ दुडाकडून पराभव पत्करावा लागला. पण या पराभवामुळेच गुकेशने अजून जोमानं मेहनत करत पुढच्या सामन्यांमध्ये विजय मिळवला.पहिल्या पराभवानंतर गुकेशन सलग पाच विजयांची आश्चर्यकारक मालिका कायम ठेवली. यामुळे तो आघाडीवर पोहोचला आणि स्पर्धेत त्याची पकड मजबूत झाली.सातव्या आणि आठव्या फेरीत अनिश गिरी आणि क्रोएशियाच्या इव्हान एरिक विरुद्ध बरोबरी साधल्यानंतर, गुकेशने अंतिम फेरीत रॅपिड सेक्शनमध्ये वेस्ली सो वर महत्त्वपूर्ण विजय मिळवला. गुकेशची अचूकता, संयम यामुळे तो स्पर्धेतील एक मोठा कट्टर प्रतिस्पर्धी ठरला.

# स्टोक्सने पंचांशीही मैदानातच घातला वाद!

## यशस्वी जैस्वालच्या विकेटवरून मैदानात मोठा गोंधळ

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत वि. इंग्लंड दुसऱ्या कसोटीत बेन स्टोक्स यशस्वी जैस्वालच्या विकेटवरून मैदानात चांगलाच संतापलेला पाहायला मिळाला. यादरम्यान त्याने पंचांशीही वाद घातला. भारताने इंग्लंडला तिसऱ्या दिवशी ४०७ धावांवर सर्वबाद केलं.**



इंग्लंडकडून हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांनी ३०३ धावांची भागीदारी रचत संघासाठी मोठी धावसंख्या उभारली. तर मोहम्मद सिराजने ६ विकेट्स आणि आकाशदीपने ४ विकेट्स घेत इंग्लंडचा डाव गुंडाळला. पण भारताच्या दुसऱ्या डावात स्टोक्स का संतापला, जाणून घेऊया. भारताने इंग्लंडला ४०७ धावांवर सर्वबाद केल्याने भारताला १८० धावांची मोठी आघाडी मिळाली. भारताने दुसऱ्या डावाला चांगली सुरूवात करत संघाच्या सलामीवीरांनी झटपट धावा केल्या. यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांनी चौकारांची आतिषबाजी करत झटपट ५० धावांची भागीदारी रचली. भारताने ७.२ षटकांत ५० अधिक धावांचा पल्ला गाठला.

जोश टंगच्या षटकात राहुल आणि यशस्वी यांनी अर्धशतकी भागीदारी तर केलीच. पण भारताला पहिला झटकाही बसला. भारताने यशस्वी जैस्वालच्या रूपात पहिली विकेट गमावली. जोश टंगने आठव्या षटकातील चौथ्या चेंडूवर जैस्वालला चकित केलं आणि त्याला पायचीत केलं. टंगने टाकलेला चेंडू थेट जाऊन जैस्वालच्या पॅडवर आदळला आणि त्यांनी पायचीतचं अपील केलं. पंचांनी बऱ्याच वेळाने आऊट असल्याचा इशारा केला. निराश झालेला यशस्वी जैस्वाल राहुलबरोबर रिव्ह्यूकरता चर्चा करण्यासाठी त्याच्याइथे पोहोचला. राहुलबरोबर चर्चा सुरू झाल्यावर रिव्ह्यूसाठी स्टॉपवॉच सुरू झालं. दोघंही चर्चा करत होते आणि वेळ ७,६,५,४,३,२,१ आणि ० होऊन स्टॉपवॉच स्क्रिनवरून जात असताना जैस्वालने रिव्ह्यूची मागणी केली. पंचांनी लगेच रिव्ह्यूसाठी इशारा केला. तितक्यात जैस्वालच्या विकेटचा आनंद साजरा करणाऱ्या इंग्लंड संघाच्या घोळक्यातून बेन स्टोक्स मोठ्याने ओरडत पंचांजवळ येऊ लागला. बेन स्टोक्स ए नाही नाही असं म्हणत पंचांजवळ आला.

### जैस्वालने वेळेत रिव्ह्यू घेतला

स्टोक्सच्या मते यशस्वी जैस्वालने वेळ निघून गेल्यानंतर रिव्ह्यूचा इशारा केला होता. त्यामुळे त्याला तिसऱ्या पंचांपर्यंत रिव्ह्यू जाऊच शकत नाही, असं स्टोक्सचं म्हणणं होतं. तो हातवारे करत पंचांना नाही नाही म्हणत त्यांच्याजवळ येऊन चर्चा करत होता.बेन स्टोक्स बोलण्यासाठी येताच इंग्लंडच्या चाहत्यांनीही टीम इंडियाची हुर्यो उडवण्यासाठी सुरूवात केली.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।

। दि. 5 जुलै 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आ. सुनील शेळके यांच्या हत्येचा कट उघड!

## एसआयटी स्थापन: गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची विधानसभेत घोषणा

**। मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवडमध्ये एका भयानक कटाचा पर्दाफाश झाला असून मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या संभाव्य हत्येचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे. यासंदर्भात आमदार शेळके यांनी महाराष्ट्र विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडत गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या या सूचनेला उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) नेमण्याचा निर्णय सात दिवसांत घेण्याची ग्वाही दिली.परंतु प्रकरणाचे गांभीर्य ओळखून लगेचच एस आय टी स्थापन करण्यात आली.**





### सात सराईत गुन्हेगार, नऊ पिस्तूल, 42 जिवंत काडतुसे

२६ जुलै २०२३ रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या दरोडाविरोधी पथकाने गुप्त माहितीनुसार तळेगाव दाभाडे परिसरात मोठी कारवाई केली होती. यामध्ये सुरुवातीला दोन गुन्हेगार पकडण्यात आले. त्यानंतर तपासाचा विस्तार करत एकूण सात सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली, ज्यांच्याकडून नऊ पिस्तूल, ४२ जिवंत काडतुसे, कोयते अशा प्राणघातक शस्त्रास्त्रांचा साठा जप्त करण्यात आला. या गुन्हेगारांवर आधीच खून, खुनाचा प्रयत्न, जाळपोळ, खंडणी, बेकायदेशीर हत्यारे बाळगणे, लूट, तोडफोड असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### सुनील शेळके यांची हत्या करण्याचाच उद्देश

तपासादरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली – या गुन्हेगारांकडून जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांचा वापर आमदार सुनील शेळके यांची हत्या करण्यासाठीच होणार होता, असा खुलासा त्यांच्याकडून जबाबामध्ये झाला आहे. हे आरोपी मध्यप्रदेश, जालना, वडगाव, काळेवाडी परिसरातले असून आमदार शेळके यांचे कोणतेही वैयक्तिक वैर त्यांच्याशी नव्हते. त्यामुळे या गुन्हेगारांच्या पाठीमागे कोणी शक्तिशाली सूत्रधार असल्याचा संशय शेळके यांनी विधानसभेत व्यक्त केला.

### “कोण करतंय लाखो रुपयांची गुंतवणूक?” – आमदार शेळके

शेळके यांनी असे नमूद केले की, ही टोळी गरीब आणि सामान्य कुटुंबातील असूनही त्यांच्याकडे नऊ पिस्तूल, कोयते खरेदी करण्यासाठी लाखोंचा खर्च झाला. एवढेच नव्हे तर, ज्या नामांकित वकिलांनी आरोपींची बाजू घेतली त्यांच्या फीही लाखोंच्या घरात होती. मग या सगळ्यांमागे “हे पैसे कोण पुरवतंय?”, आणि “माझ्या हत्या कटामागचा सूत्रधार कोण?”, असा थेट सवाल शेळके यांनी उपस्थित केला.

### तडीपार असूनही जिल्ह्यात वावर

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तरात सांगितले की, पकडलेले गुन्हेगार दीड वर्ष तुरुंगात होते. नंतर बेल मिळाल्यावर त्यांना दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले. मात्र, तडीपार असूनही हे गुन्हेगार पुणे जिल्ह्यात लपून येतात, असा आरोपही आमदार शेळके यांनी केला.

### सखोल तपास होणार

या गंभीर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन योगेश कदम यांनी विधानसभेत उत्तर देताना SIT नेमण्याचा निर्णय पुढील सात दिवसांत घेण्यात येईल, अशी घोषणा केली. परंतु प्रकरणाचे गांभीर्य पाहून लगेचच एस आय टी ची स्थापन करण्यात आली या सात गुन्हेगारांपैकी काहींना शस्त्र पुरवणारा “देवराज” नावाचा मध्यप्रदेशातील व्यक्ती असून त्याची माहितीही संबंधित राज्य सरकारला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणात “कोण पैसे पुरवतं?”, “मूळ सूत्रधार कोण?”, याचा सखोल छडा लावण्याचे आश्वासन गृह राज्यमंत्री कदम यांनी दिले. ही घटना केवळ एका लोकप्रतिनिधीवर जीवघेणा हल्ला करण्याच्या कटापर्यंत मर्यादित न राहता, राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही चिंतेची बाब ठरत आहे.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune


DYP — DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvg, Technouniq, RPG, CONSTROLOGIX, NASSCOM FOUNDATION, INDOVANCE, Tech Mahindra, DataTech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."

## गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये

# वृक्षदिंडी व वारी सोहळा उत्साहात!

## शिक्षण विश्व: चिमुकल्यांनी उभं केलं पंढरीसारखं भक्तीमय वातावरण

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल, फेज २ येथे वृक्षदिंडी व वारी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील पंढरपूर वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून सांस्कृतिक शिक्षणाचाही एक महत्त्वाचा भाग आहे. ही परंपरा विद्यार्थ्यांना समजावी, यासाठी शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला.**




शाळेचे अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली सकाळी ९ वाजता पालखी व वृक्षदिंडीचा शुभारंभ करण्यात आला. दिंडीने गायत्री स्कूल ते शिवमंदिर असा मार्ग घेतला. मार्गामध्ये चिमुकल्या वारकऱ्यांनी टाळ, मृदंगाच्या तालावर नृत्य, फुगडी आणि भारुड सादर करत पारंपरिक वारीचा आनंद घेतला. या कार्यक्रमाला संस्था सचिव संजय भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील, विश्वस्त सरिता विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी, तसेच गंधर्वनगरी आणि फेज २ येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी आणि वृक्षदिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला. शाळेच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी विशेष कौतुक केले.

### परिसर भक्तीमय...

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ पारंपरिक रिंगण घालण्यात आले आणि तिथे विद्यार्थ्यांनी पारंपरिक गजर व गायन सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शिवमंदिर परिसरात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेचे संस्कृत शिक्षक आचार्य दीपक शिंदे सर यांनी कीर्तन सादर केले. त्यांच्या भजन व कीर्तनातून पंढरीच्या वारीचे वर्णन करण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

